महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे सन २०१८-१९ चे अर्थसंकल्पिय अंदाज व सन २०१७-१८ चे सुधारित अंदाज यांना मंजुरी मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्र.एसटीसी-०११८/प्र.क्र.९९/परि-१

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ०१ ऑगस्ट, २०१९ .

<u>वाचा -</u> उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.मा.प.म., यांचे पत्र क्र.राप/लेखा/अंववि/३१/ २०१८-१९/१५९, दि. २३ जानेवारी, २०१८ .

<u>शासन निर्णय -:</u>

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम, १९५२ मधील नियम १४ अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रस्तवित केलेल्या सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पिय अंदाजास तसेच सन २०१७-१८ च्या सुधारित अंदाजास खाली नमूद केल्याप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे.

(रु.लाखात)

अ.क्र.	तपशील	सुधारित अंदाज २०१७-१८	प्रस्तावित अर्थसंकल्पिय अंदाज २०१८-१९
अ) भांडवली खर्च :			
१	जमिन व इमारती	१७६०२.११	२९१०७.६४
२	बसगाडया-(अ) किंमत	३५०६६.४३	१५००६.२०
	(ब) संख्या	२८३१ बसेस	२३०० वातानूकुलीत बसेस
३	यंत्रसामग्री व साधनसामग्री	७८८७.७९	११३०२.२६
	एकूण	**६०५५६.३३**	**५५४१६.१०**
ब) साधनसंपत्ती :			
१	निव्वळ अंतर्गत साधनसंपत्ती	(-)२७५०५.६८	(-) ७६२८.९०
२	राज्य शासनाकडून भांडवली अंशदान	५०७९६.००	५४३३५.००
३	राज्य शासनाकडून भांडवली अनुदान (बसस्थानकांचे आधुनिकीकरण व दर्जावाढ)	००.००	८७१०.००
	कर्ज इत्यादी	३७२६६.०१	००.००
	एकूण	**६०५५६.३३**	**५५४१६.१०**

२. मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम, १९५० च्या कलम २६ अनुसार बँका व इतर वित्तिय संस्थांकडून वर दर्शविल्याप्रमाणे कर्ज घेण्यासाठी शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. वरीलप्रमाणे प्रस्तावित भांडवली खर्च हा त्या वर्षाच्या उपलब्ध साधनसंपत्तीच्या मर्यादेत राहील, या अटीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

४. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम, १९५२ च्या नियम १४(२) खालील तरतूदीनुसार अर्थसंकल्पाच्या अधिप्रमाणित प्रती केंद्र शासन, राज्य शासन व महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१०१/सा.उ.,दिनांक ३०.११.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार तसेच राज्य सार्वजनिक उपक्रम पुनर्विलोकन समितीने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१९०८०११६४९२१६४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Meghana Gaurav Shinde

Digitally signed by Meghana Gaurav Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supply and Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d29224e30812c4523eedb32c54f5cbc27548f81ccf656192b6d735115af1dfb8, serialNumber=d625cf85c370bb4c35f332d5f951f0a9cd61fad5ddf056809a969bfdd9fdb7da, cn=Meghana Gaurav Shinde
Date: 2019.08.01 16:54:21 +05'30'

(मेघना गौरव शिंदे)
कक्ष अधिकारी, गृह (परिवहन) विभाग

प्रत,

१. सचिव, भूपृष्ठ वाहतूक, भारत सरकार, नवी दिल्ली (पत्राने)
२. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई
३. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४. वित्तिय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई
५. सचिव, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई-८
६. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
७. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षण), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
८. महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परिक्षा), मुंबई
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०. निवासी/लेखा परिक्षा अधिकारी, वांद्रे (पुर्व), मुंबई ४०० ०५१
११. वित्त विभाग (व्यय -८/साऊ/) विनियम, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१२.नियोजन विभाग ,(१४६१.का) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१३. गृह विभाग (बीयुडी-१/बीयुडी-२/ परिवहन-३/ परिवहन-४), मंत्रालय, मुंबई
१४.निवडनस्ती-परिवहन/१.